Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# चलनवाढ : भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील एक आव्हान

**प्रा. डॉ. विलास तुळशिराम ठाकूर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री शिवाजी कॉलेज कंधार
vilasthakur13@gmail.com

प्रस्तावना:

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशामध्ये अनेक प्रकारच्या समस्या होत्या. त्यामध्ये बेकारी, दारिद्र्य भुकबळी, उपासमार, अन्नधान्य टंचाई, लोकसंख्यावाढ या समस्या त्याच बरोबर देशासमोर भाववाढ किंवा मुद्रास्फिती ही अर्थव्यवस्थेसमोर मोठ्या प्रमाणात असलेली समस्या आहे. 1951 पासून नियोजनबध्द आर्थिक विकास सुरु झाला असून सध्या 12 वी पंचवार्षिक योजना सुरु आहे. तरी भाववाढीची समस्या सतत कमी अधिक प्रमाणात देशामध्ये जाणवते आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सतत भाववाढ होत गेली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम येथील लोकांच्या जीवनमानावर, उत्पन्नावर, राहणीमानावर निश्चित झालेला दिसून येतो. भाववाढीचा प्रश्न हा सर्वांच्या जीव्हाळ्यांचा प्रश्न बनला आहे पण भाववाढ म्हणजे नेमके काय ? या प्रश्नांचे उत्तर अद्यापपर्यंत तरी या बाबत देशातील  राजनितीज्ञ, सामान्य जनता यांच्यात एकवाक्यता आढळून येत नाही. ह्या प्रश्नांच्या संदर्भात भाववाढ म्हणजे नेमके काय ? ती निर्माण का होते ? ती रोखण्यासाठीची प्रभावी धोरणे कोणती ? तिचा आर्थिक धोरणावर कोणता परिणाम ह्या अनेक अंगानी विचार होणे गरजेचे आहे. नव अभिमत अर्थशास्त्रज्ञांनी स्वातंत्र्यपूर्वकाळात जागतिक महामंदीनंतर थोडा फार विचार केलेला आढळतो. भाववाढीवर सतत, नेहमी, चर्चा होत असते. त्यासंबंधी वेगवेगळे मतप्रवाह आहेत त्याचा थोडक्यात अर्थ व व्याख्या समजून घेणे गरजेचे आहे.

महागाई हा एक प्रकारचा कर आहे.
जो की नागरिकांना चुकविणे अवघड जाते
- जे.एम.केन्स

अर्थ :

1) सर्वसाधारणपणे भाववाढ म्हणजे वस्तु व सेवांच्या किंमतीत झालेली वाढ होय.
2) जेंव्हा वस्तु व सेवांचा पुरवठा चलन पुरवठ्याच्या तुलनेत अल्प असतो. तेंव्हा अर्थ व्यवस्थेत भाववाढ होते.

व्याख्या :

1) क्राऊथर : चलनवाढ म्हणजे अशी अवस्था असते की, ज्यात पैशाचे मुल्य कमी होते. म्हणजेच वस्तुंच्या किंमती वाढतात.
2) कोलबर्न : ज्यावेळी अति चलन अति कमी वस्तुंचा पाठलाग करते, तेंव्हा त्यास चलनवाढीची अवस्था म्हणतात.

संशोधनाची उद्दिष्टये :

1) भाववाढीमुळे सर्वसामान्य अल्प उत्पन्न घटकांवर होणारा परिणाम लक्षात घेणे.
2) वस्तुंच्या किंमतीतील चढउताराची पातळी लक्षात घेणे.
3) जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्यामुळे त्याचा स्थिर आणि अल्प उत्पन्न घटकांवर होणारा परिणाम लक्षात घेणे.

गृहीतके :

1) वस्तुंच्या किंमत वाढीमुळे समाजातील आर्थिकदृष्टया कमकुवत घटकांवर परिणाम झाला आहे.
2) भाववाढीमुळे लोकांना किंमत स्थिरतेसंबंधी शाश्वती राहिलेली नाही.
3) स्थिर उत्पन्न असलेल्या घटकावर मोठ्या प्रमाणात भाववाढीचा परिणाम झाला आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध निबंधाकरिता दुय्यम साधनसामुग्रीचा वापर कलेला आहे. भाववाढीचा संदर्भात शासनाचे अहवाल, सर्वेक्षण, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रातील कात्रणे या माध्यमातून प्राप्त झालेल्या माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

भारताची सद्य:स्थितीतील भाववाढ :

भारतातील अलिकडच्या काळातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे कृषी उत्पादनातील चढउतार होय. कृषी वस्तुंच्या किमतीतील वाढीची प्रवृत्ती होय. भारतात नियोजन काळात लोकांच्या क्रयशक्तीत वाढ झाली. यामुळे वस्तु व सेवांच्या मागणीत वाढ झाली. पण अन्नधान्याच्या उत्पन्नात चढउतार होत राहिले. अन्नधान्याचा पुरवठा मागणीच्या तुलनेत

कमी पडला परिणामी भाववाढीला कृषी क्षेत्रात तोंड द्यावे लागत आहे. सन 2001-02 मध्ये भारतातील अन्नधान्याचे उत्पादन 213 दशलक्ष टनाइतके होते. सन 2002-03 मध्ये ते 174 लशलक्ष टनापर्यंत घसरले. सन 2003-04 मध्ये पून्हा 212 दशलक्ष टन वाढले. सन 2008-09 मध्ये ते 233.8 दशलक्ष टनापर्यंत वाढल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एकंदरीत अन्नधान्याच्या किंमती आणि सर्वसाधारण किंमत पातळी वाढण्यास चालना मिळाली आहे.

भारतात फळे व भाजीपाल्याचे 175 दशलक्ष टनाइतके उत्पादन निघते पण आवश्यक सुधारणांच्या अभावामुळे दरवर्षी जवळपास 70,000 कोटी रुपये मुल्यांची हंगामेत्तर पिके वाया जातात यामुळे फळे व भाजीपाल्यांच्या किंमती वाढतात.

आंतरराष्ट्रीय बाजारातील खनिज तेलांच्या वाढत्या किंमतीमुळे भाववाढ होत आहे. पेट्रोलियम तेल आणि वंगणाच्या (POL) आयात खर्चात मोठी वाढ झाली आहे. 1960-61 मध्ये एकूण आयात खर्चातील खनिज तेल आयात खर्चाचा हिस्सा केवळ 6.1% होता. 2007-08 मध्ये 33.8% हिस्सा केवळ आयातीसाठी वापरण्यात आला. 2007-08 मध्ये 79,614 दशलक्ष डॉलर्स इतक्या मूल्यांची आयात करण्यात आली. 2006-07 च्या तुलनेत आयात 40% वाढली.

भावाढीस अनेक घटक जबाबदार आहेत. त्यामध्ये नैसर्गिक आपत्ती, वेतनवाढ, नियोजित वाढ, कच्चा मालाचा तुटवडा, करातील वाढ, सरकारच्या खर्चातील वाढ आशा अनेक घटकांवर भाववाढ अवलंबून असते.

भारतात सध्या दिसून येत असलेली भाववाढीची परिस्थिती ही जागतिक स्तरावरील आर्थिक घटकांचा परिणाम असला तरी देशांतर्गत स्थिती नियंत्रीत करणे त्या देशाच्या सरकारवर अवलंबून असते. जागातील दोन तृतीयांश पेक्षा जास्त देश सध्या चलनवाढीच्या समस्येला तोंड देत आहेत. भारतही या आंतरराष्ट्रीय भाववाढीच्या विळख्यात सापडला आहे. अन्नधान्य, खाद्यतेल, इंधन तेल, स्टील, भाजीपाला या सारख्या वसुंची मागणी या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात त्याचा पुरवठा न होऊ शकल्याने चलनवाढ अस्तित्वात आली आहे. विशेषत: जीवनावश्यक वस्तुंच्या पुरवठा यंत्रणेतील अडथळे सन 2009 च्या मानसुनने दगा दिलेला, वित्तीय तुट आणि अन्नधान्याच्या उत्पादनातील घटीमुळे देशात भाववाढीने रौद्र रुप धारण केलेले आहे. हे खालील तक्त्यांच्या अनूषंगाने स्पष्ट होते.

तक्ता क्र.2

डब्ल्यु पीआयच्या प्रमुख वस्तुंच्या अनुसार वार्षिक सरासरी चलनवाढ

(टक्केवारीत)

| वर्ष | प्राथमिक वस्तू | इंधन, विद्युत प्रकाश आणि स्नेहक | विज निर्मित उत्पादन | सर्व वस्तु |
|---|---|---|---|---|
| भार (टक्केवारीत) | 22.2 | 14.23 | 63.75 | 100.00 |
| 2000-01 | 2.8 | 28.5 | 3.3 | 7.2 |
| 2001-02 | 3.6 | 8.9 | 1.8 | 3.6 |
| 2002-03 | 3.3 | 5.5 | 2.6 | 3.4 |
| 2003-04 | 4.3 | 6.4 | 5.7 | 5.5 |
| 2004-05 | 3.7 | 10.1 | 6.3 | 6.5 |
| 2005-06 | 2.9 | 9.5 | 3.1 | 4.4 |
| 2006-07 | 7.9 | 5.6 | 4.4 | 5.4 |
| 2007-08 | 7.6 | 0.9 | 5.0 | 4.7 |
| 2008-09 | 10-93 | 11.2 | 9.47 | 10.20 |
| 2009-10 | 8.78 | -6.35 | 1.77 | 1.63 |

स्त्रोत : औद्योगिक निती व संवर्धन विभाग आणि आर्थिक सर्वेक्षण-2009-10 अ- अंतिम

भाव वाढीचे कारणे :

1) सार्वजनिक खर्चातील वाढ
2) मौद्रीक धोरणातील बदल
3) वित्तीय धोरणातील बदल
4) युध्दजन्य परिस्थिती
5) नैसर्गिक आपत्ती
6) लोकसंख्या वाढ
7) अतिरिक्त नफा
8) तुटीचा अर्थभरणा
9) वेतनवाढ
10) करातील वाढ
11) आयातीत घट व निर्यातीत वाढ

भाववाढीचा परिणाम :

अर्थव्यवस्थेतील भाव वाढीचा परिणाम अनुकूल असतो असे मानले जाते. कारा वस्तुंच्या किंमती जेंव्हा वाढतात तेंव्हा उत्पादकाला जास्त उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळते. त्यातून जास्तीची गुंतवणूक करतो. त्यासाठी तो व्यापारी बँकाकडून कर्ज काढतो त्याचा परिणाम पतपुरवठा वाढण्यावर होतो. लोकांच्या उत्पन्नात वाढ गुंतवणुकीमुळे होते. भाववाढीच्या काळात उत्पादन, राजगार, उत्पन्न, गुंतवणूक यांच्यात वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्न वाढते. ही परिस्थिती तो पर्यंत चाले राहते जोपर्यंत अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार निर्माण हात नाही. देशात पूर्ण रोजगार निर्माण झाल्यानंतर जेंव्हा वस्तुंच्या किंमती वाढतात तेंव्हा त्याचा परिणाम मात्र फक्त किंमतीवर होतो. उत्पादनावर होत नाही. त्यामुळे केन्स म्हणतो की, अर्थ व्यवस्थेत पूर्ण रोजगार निर्माण होई पर्यंत वस्तुंच्या किंमती फायदेशीर ठरतात. त्यानंरतची भाववाढ मात्र विविध प्रश्न निर्माण करणारी ठरते.

थोडक्यात भाववाढीच्या काळात अल्पभुधारक, कामगार व भांडवलदार यांच्या वास्तव वेतनात घट होते. तर फक्त संयोजकाच्या उत्पन्नात वाढ होते. त्याचा परिणाम अर्थ व्यवस्थेतल संयोजक श्रीमंत होत जातो. तर इतर घटकांची अवस्था अतिशय कठीण होते. त्यातुन देशाच्या एकूण उत्पन्नापैकी जास्तीत जास्त उत्पन्न मर्यादीत उत्पादकाकडे व कमीत कमी उत्पन्न इतर सर्व लोकांच्याकडे जाते त्यातून समाजात उत्पन्नाची विषम वाटणी होते. ही विषमता वेळेवर रोखली गेली नाही तर त्यातून देशात अराजकता, अशांतता, जाळपोळ, लूट, क्रांती प्रश्न निर्माण होऊन अर्थ व्यवस्था खिळखिळी होते.

अर्थतज्ज्ञांच्या मते साधारणपणे 3% चलनवाढ प्रवृत्ती आर्थिक विकासाला उपयुक्त ठरते, परंतु देशात निर्माण झालेली WIP स्वरुपातील 8.45% चलवाढ (खाद्य वस्तुंमधील 17.41%) दुरगामी परिणाम करणारी ठरते. चलनवाढीचा मसजातील सर्व घटकांवर आथिक व सामाजिक परिणाम झाल्याचे दिसून येते. विशेषत: कमी उत्पन्न गटातील लोकांचे बेहाल होतात. भूकबळींची संख्या वाढते, गुन्हेगारी, दारिद्र्ये, बेकारी आथिक विषमता वाढीस लागते. त्याचबरोबर विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण हो ातात. सट्टेबाजीस उत्तेजन मिळते, कल्याणकारी योजनांवर अनिष्ठ परिणाम होतात. व्यवहार तोल प्रतिकूल निर्माण होतो. बचत व गुंतवणूकीवर परिणाम होतो. लोकांचे जीवनमान घसरते, चैनीच्या वस्तु उत्पादनाला चालना

मिळते, इंधन महागल्यामुहे वाहतुक, दळण्पवळण, वीज इत्यादी सर्व क्षेत्रांवर चलनवाढीचा प्रतिकूल परिणाम होतो.

भाववाढीवर उपाय योजना:

1) मौद्रीक धोरणामुळे भाववाढी आळा बसू शकतो.
2) करामध्ये वाढ करुन भाववाढीस आळा बसविता येऊ शकतो.
3) अनिवार्य बचतीच्या साधनांचा उपयोग करुन
4) साठेबाजीला आळा घालून भाववाढ रोखता येते.
5) लोकसंख्या नियंत्रण कठोरपणे राबविल्यास भाववाढीस आळा बसू शकतो.
6) कृषीची उत्पादकता वाढवून भाववाढीस आळा घालता येतो.
7) नविन आथिक व्युहरजचना आखून भाववाढीस आळा घालता येतो.
8) भ्रष्टाचार व काळा पैशावर कडक निर्बंध आणून भाववाढ रोखता येऊ शकते.
9) विकासेत्तर खर्चाचे नियंत्रण करता येते.

निष्कर्ष:

भारताने गेली अनेक दशके विविध पंचवार्षिक योजनेच्या साहाय्याने नियोजन करुन सुध्दा देशातील भाववाढीची समस्या आजूनही कमी झालेली नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेपुढे व सरकार समोर भाववाढ ही एक मोठे आव्हान आहे. याचा परिणाम देशातील आथिकदृष्टया दुर्बल व वंचित घटकांवर मोठ्या प्रमाणात पडत आहे. ज्यांचे उत्पन्न स्थिर आहे. ज्यांना कोणता वेतन आयोग नाही. या घटकांना भाववाढीचा चटका मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे.

संदर्भ :

1) Ruddar Datt K.P.M.Sundharam (1995) Indian Economy
2) राम देशमुख (1998), स्थुल अर्थशास्त्र, कल्पना मुद्रणालय पुणे.
3) रंजन कोळंबे (2010), भारतीय अर्थव्यवस्था, भगिरथ प्रकाशन पूणे.
4) योजना (विकास समर्पित मासिक) अंक 1 ऑगस्ट 2010.
5) ए.आर. रायखेलकर (2004), स्थूल अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.